# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 02.04.2024** **वार: मंगळवार**

---

**मतदार जनजागृती**

आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी स्थानिक प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जात आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेने चिखली इथल्या मजूर अड्ड्यावर मतदार जागृती केली.

बारामती, इंदापूर, खडकवासला, दौंड, भोर आणि पुरंदर विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी मतदारांना निवडणूक प्रक्रीयेची माहिती देण्यात आली. इंदापूरमध्ये मतदार जागृती मंचाच्यावतीने मतदार यादीत नाव शोधण्याची माहिती देण्यासाठी शिबीर घेण्यात आलं. खडकवासला विधानसभा मतदारसंघात वडगाव बुद्रुक इथं महिला बचत गटाच्यावतीने विठ्ठल मंदिरात मतदान जनजागृती करण्यात आली.

दौंड विधानसभा मतदारसंघात यवत आणि दहिटने इथं अंगणवाडी सेविका आणि महिला मतदारांनी मतदान करण्याबाबत प्रतिज्ञा घेतली. शिरुर लोकसभा मतदारसंघात विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून मतदान जागृती केली.

आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील गावडेवाडी इथं जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि हिरकणी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती फेरी काढली. यावेळी 193 मतदारांकडून मतदान करण्याबाबत संकल्पपत्र भरुन घेतलं.

**जनतादल सेक्युलर पाठिंबा**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जनता दल सेक्युलरने महायुतीला पाठींबा दिला असल्याची माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाथभाऊ शेवाळे यांनी पुण्यात दिली. जनता दल सेक्युलर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान एच.डी देवेगौडा यांनी उपुमख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधला होता; त्यानंतर महायुतीच्या उमेदवारांना पाठींबा देण्याचं पक्षानं ठरवलं, असं शेवाळे यांनी सांगितलं.

**जागतिक मूत्रपिंड जागृती**

जागतिक मूत्रपिंड आरोग्य महिन्यानिमित्त पुण्यातील नोबल रुग्णालयाच्या वतीनं मूत्रपिंड आरोग्याविषयी जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. यामध्ये तज्ञ डॉक्टरांनी मूत्रपिंडाचे आजार, लक्षणे, निदान, आणि उपचार तसंच मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी पोषण आणि आहार याविषयी माहिती दिली.

**जादा गाड्या**

उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन एसटीच्या पुणे विभागानं येत्या 15 तारखेपासून विविध ठिकाणी जादा गाड्या सोडण्याचं नियोजन केलं आहे. स्वारगेट, वाकडेवाडी, पुणे स्टेशन, पिंपरी चिंचवड, सासवड, नारायणगांवसह अन्य आगारांतून या जादा गाड्या राज्यभर वेगवेगळ्या जिल्ह्याच्या ठिकाणी सोडण्यात येतील, अशी माहिती पुणे विभागाचे नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली.

**पुरस्कार**

बंधुता लोकचळवळीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विश्वबंधुता साहित्य संमेलनाचं आयोजन केलं जाणार आहे. यानिमित्ताने दिल्या जाणाऱ्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वबंधुता पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते, माजी आमदार आणि साहित्यिक ऍडव्होकेट जयदेव गायकवाड, कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या ज्येष्ठ सदस्य नलिनी व्यंकटराव पणसा आणि भारतीय जैन संघटनेच्या वाघोली इथल्या महाविद्यालयाला हा पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 12 एप्रिल रोजी पुरस्कारांचं वितरण होईल, अशी माहिती राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली.

**पुरस्कार**

मारवा कला फाऊंडेशनतर्फे यंदाचा पंडित नाथ नेरळकर पुरस्कार सूरश्री पंडित  मोहनकुमार दरेकर यांना देण्यात येणार आहे. येत्या रविवारी पुण्यात पुरस्कार वितरण होईल.

**पथकर**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं कालपासून पथकराच्या दरात किमान अडीच टक्के वाढ केल्यानं पुणे सातारा आणि पुणे नाशिक महामार्गावरील प्रवास महागला आहे. पुणे सातारा रस्त्यावरील खेड शिवापूर पथकर नाक्यावर आता हलक्या वाहनांसाठी एकेरी प्रवासासाठी 115 रुपयांऐवजी 120 रुपये दराने पथकर आकारला जाईल.

**निर्बंध**

पुण्याजवळील लोणावळा-खंडाळा, मळवली या थंड हवेच्या ठिकाणी आपले आलिशान बंगले पर्यटकांना भाड्यानं देणाऱ्या मालकांवर ग्रामीण पोलिसांनी काही निर्बंध जारी केले आहेत. त्यानुसार बंगला मालकांना भाडेकऱ्यांची संपूर्ण माहिती नजीकच्या पोलीस ठाण्यात देणं अनिवार्य करण्यात आलं आहे. दोन दिवसांपूर्वी एका बंगल्यात आक्षेपार्ह चित्रीकरण होत असल्याची घटना उघडकीला आल्यानंतर या मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

**फिक्की**

उद्योजकांची शिखर संस्था असलेल्या फिक्की या संस्थेच्या महिला पुणे शाखेच्या अध्यक्षपदी पिंकी राजपाल यांची निवड करण्यात आली आहे. मावळत्या अध्यक्ष रेखा मगर यांनी त्यांच्याकडे नुकतीच अध्यक्षपदाची सूत्रं सोपवली.

**हॉकी**

बंगळुरूमध्ये होणाऱ्या वरिष्ठ महिला गटाच्या राष्ट्रीय शिबिरासाठी हॉकी इंडियाने महाराष्ट्रातील सहा खेळाडूंची निवड केली आहे. यामध्ये पुण्यात सराव करणाऱ्या ऋतुजा पिसाळ, अक्षता ढेकळे यांना संधी देण्यात आली आहे. याशिवाय साताराची वैष्णवी फाळके, काजल आटपाडकर, रायगडची मनश्री शेडगे आणि हिंगोलीची भावना खाडे यांना राष्ट्रीय शिबिरात स्थान देण्यात आलं आहे. हे शिबिर 8 एप्रिलपर्यंत चालणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 39 तर किमान 18 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या दुपार नंतर आकाश अंशतः राहून कमाल तापमान 40 अंशांच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**